आरोग्य विभाग
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
दि. १७/०८/२०२१

**मान्यतेस्तव सविनय सादर,**

**विषय- संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन कचरा डेपोवर जमा होणारा प्लॅस्टीक कचरा विक्री करणेबाबत.**

**संदर्भ – १) ग्लोबल पॉलीमर्स, चिखली, ता. हवेली जि. पुणे यांचे दि. ०४/०४/२०२१ रोजीचे पत्र.**
**२) आरोग्य विभागाकडील दि. ०९/०४/२०२१रोजीची मंजुर टिपणी.**
**३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दि. ०८/०५/२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.**
**४) मा.तदर्थ समितीचे दि. ०६/०८/२०२१ रोजी सभेतील विषय क्र. ७१ व निर्णय क्र. १११**

संस्थान इमारती व परिसर दैनंदिन साफसफाई करुन निघणा-या घनकच-यामध्ये प्लॅस्टीकचे प्रमाण जास्त आहे. सदरचा घनकचरा सर्व्हे नं. १८२ मध्ये खड्डे करुन डपिंग डेपोवर साठविण्यात येत आहे. सदरचा कच-यावर कोणतीही प्रक्रीया न होता सध्या कचरा खड्डयांमध्ये टाकून त्यावर मातीचा थर देऊन बुजून टाकण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात सदर जागेचा वापर करावयाचा झाल्यास प्लॅस्टीक कच-याचे विल्हेवाट लावण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. गर्दीचे कालावधीत सुमारे २ ते २.५ टन सुका कचरा निघतो. त्यामध्ये प्लॅस्टीक बाटल्या, दुध पिशवी, सलाईनचे बॉटल, इत्यादी विक्री होणारे प्लॅस्टीक वगळता, सध्या विक्री न होणारे प्लॅस्टीक ( पॉलीथीन बॅग, खाद्यपदार्थांचे पाऊच, इतर विभागाकडील पॅकींगचे प्लॅस्टीक व इतर ) सुमारे दैनंदिन १५ ते २० किलो ग्रॅम प्रमाण असते. म्हणजेच महिन्याला सुमारे ४०० ते ६०० किलो ग्रॅम इतके प्लॅस्टीक निघते, साधारणपणे वार्षिक ५ ते ६ टन इतका प्लॅस्टीक कचरा विक्री करुन <u>संस्थानला विक्रीतून रु. १० ते १२ हजाराचे वार्षिक उत्पन्न मिळून उर्वरीत कुजणा-या कच-याचा संस्थानचे बगीचा विभागासाठी खत म्हणून उपयोग होईल. तसेच कचरा डेपोसाठी भविष्यात संस्थानची किंमती जागा अडकुण पडणार नाही.</u>

ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचे दि.०४/०४/२०२१ रोजीचे विनंती पत्र व आरोग्य विभागाकडील दि. ०९/०४/२०२१ रोजीचे मंजुर टिपणीनुसार दि.०८/०५/२०२१ रोजी संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघाण-या प्लॅस्टीकचा पुर्नवापर करणे व विक्री दराबाबत चर्चा करणेकामी बोलविण्यात आलेले होते. त्यानुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांचे कक्षात खालील मुद्दयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आला आहे.

ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांनी दि.०४/०४/२०२१ रोजीचे पत्रामध्ये खालीलप्रमाणे दोन प्रस्ताव संस्थानकडे सादर केले आहेत.

१) संस्थान मार्फत प्लॅस्टीक मटेरीयल वर्गीकरण करुन व गठ्ठे बांधुन दिल्यास ०३ रुपये प्रति किलो ग्रॅम या प्रमाणे (रु. ३००० प्रति टन) संस्थानास मोबदला देण्यात येईल.
२) शिर्डी संस्थान डेपो ठिकाणी आमचे कामगार लावून मटेरियल वेगळे करुन गठ्ठे बांधून घेतले तर रु. १.५/- प्रति किलो ग्रॅम म्हणजे ( १५०० रुपये प्रति टन) या प्रमाणे संस्थानास मोबदला देण्यात येईल.

उपरोक्त प्रस्तावाबाबत दि. ०८/०५/२०२१ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचे प्रतिनिधी श्री. प्रताप थोरात यांचेशी सविनय चर्चा करुन त्यांनी त्यांचे कामगार लावून प्लॅस्टीक मटेरीयलचे वर्गीकरण करुन गठ्ठे बांधुन वाहतुक व इतर सर्व समावेशक खर्चासह रु. ०२.०० प्रति किलो ग्रॅम (रुपये २०००/- प्रति टन) दर त्यांनी मान्य केले आहेत.

त्यानुसार संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन कचरा डेपोवर जमा होणारा प्लॅस्टीक कचरा विक्री करणेबाबतचा विषय मा.तदर्थ समितीचे दि. ०६/०८/२०२१ रोजी सभेत निर्णयार्थ ठेवण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन, **"फक्त ग्लोबर पॉलीमर्स, चिखली यांचेवर विसंबुन न राहता त्यांचे**

**व्यतिरिक्त जे-कोणी हे काम करण्यास तयार आहेत त्यांची माहिती संस्थानचे संकेत स्थळावर व वर्तमान पत्रामधुन जाहिर प्रसिध्दी देऊन मागवुन घ्यावी. व पुढील कार्यवाहीसाठी समितीसमोर प्रस्ताव ठेवण्यात यावा. ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांना देण्याचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे." असे ठरले.**

मा. तदर्थ समितीचे दि. ०६/०८/२०२१ रोजी सभेत निर्णयानुसार संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन कचरा डेपोवर जमा होणारा प्लॅस्टीक कचरा विक्री करणे कामी संस्थानचे संकेत स्थळावर व वर्तमान पत्रामधुन जाहिर प्रसिध्दी देऊन मागवुन घ्यावी लागेल त्याकरीता सोबतच्या मसुद्याप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करता येईल.

**विभागाचा अभिप्राय-** मा.तदर्थ समितीचे दि.०६/०८/२०२१ रोजी सभेत निर्णयानुसार संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन कचरा डेपोवर जमा होणा-या प्लॅस्टीक कच-याची विक्री उच्चतम दराने करणेकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर येथून प्रसिध्द होणा-या वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करुन दरपत्रके मागविणेत येवून त्यातील उच्चतम दरानुसार मा. तदर्थ समितीचे मान्यतेने विक्री करता येईल, असे नम्र मत आहे.

**करीता..**

अ) संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत मुंबई, पुणे, नाशिक , औरंगाबाद, अहमदनगर येथून प्रसिध्द होणा-या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस,

ब) संस्थानचे संकेत स्थळावर माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करणेस,

क) प्राप्त दरपत्रकानुसार तुलनात्मक तक्ता तयार करुन उच्चतम दरपत्रक धारकास कार्यादेश देणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ **(Ad-hoc)** समितीचे सभेपुढे सादर करणेस,

तरी उपरोक्त **अ, ब,** व **क** प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

(प्रताप कोते)
प्र. अधिक्षक

(राजेंद्र जगताप)
प्र. प्रशासकीय अधिकारी

(रविंद्र ठाकरे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**ता.राहाता जिल्हा –अहमदनगर**
**दुरध्वनी क्र. (०२४२३) २५८५००, २५८९६७**

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मार्फत संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन कचरा डेपोवर जमा होणारा प्लॅस्टीक कचरा वार्षिक विक्री करणेकामी सिलबंद दरपत्रके खालील नमुद केलेल्या अटी/शर्तीस अधिन राहून मागविणेत येत आहेत.

**अटी/शर्ती -**

१. संस्थानचे कचरा डेपोवरील कचरा उचलण्याचा कालावधी ११ महिन्यांचा असेल.

२. कचरा डेपो वरील कचरा गोळा करणे, पॅकींग करणे, वाहतूक करण्याची जबाबदारी संबंधित कंपनी/ठेकेदाराची राहील.

३. कचरा संकलीत करतेवेळी काही अपघात, दुखापत झालेस त्याची जबाबदारी संबंधित कंपनी/ठेकेदाराची राहील.

४. प्लॅस्टीक कचरा बाबत सिलबंद दरपत्रके दि.20/09/2021 अखेर सायं.५.०० वाजेपर्यत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी ता.राहाता जिल्हा –अहमदनगर या पत्यावर पाठविण्याचे करावे.

५. दरपत्रक सिलबंद करुन त्यावर **" प्लॅस्टीक कचरा विक्री निवीदा "** असा उल्लेख करावे.

६. सिलबंद दरपत्रक बंद पाकीटात सादर करायचे असून त्यासोबत रु. ५०००/- मात्रचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डी.डी. सोबत जोडणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम न भरणा-या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

७. संस्थानचे प्रतिनिधीसमोर प्लॅस्टीक कचरा वजन केल्यानंतर होणा-या रक्कमेचा भरणा संस्थानचे लेखाशाखेत करुन पावती जमा केल्यांनतर ताबा दिला जाईल.

८. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी हे कुठलीही एक अथवा सर्व निविदा कुठल्या कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क राखुन ठेवत आहे.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.